SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000
E-mail address- affiliationt1@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९११३६)

East:1962
NAAC 'A' Grade

जा.क्र. शिवाजी वि./संलग्नता टी.१/ No 0527 - दिनांक : 14 JAN 2019

प्रति,

मा.अध्यक्ष / सचिव

सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था

विषय- प्राचार्याच्या सेवानिवृत्तीच्या वयोमानात मुदतवाढ देण्याच्या अनुषंगाने.

संदर्भ-१) शासन निर्णय दिनांक ०५/०३/२०११.

२) शासन निर्णय दिनांक १२ जुलै,२०१६.

३) अवर सचिव,महाराष्ट्र शासन यांचे दिनांक ७ डिसेंबर २०१८ रोजीचे पत्र.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक ३ नुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू

सोबत वरील प्रमाणे

डॉ.व्ही.डी नांदवडेकर
कुलसचिव

महाराष्ट्र शासन

क्रमांक:- संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२७९ /१८/विशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ०७ डिसेबर, २०१८.

प्रति,

१.संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,

विषय:- प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयोमानात मुदतवाढ देण्याच्या अनुषंगाने .
सदंर्भ :- १) शासन निर्णय दि. ०५ मार्च, २०११.
२) शासन निर्णय दि. १२ जुलै, २०१६.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शासन निर्णय दिनांक ०५ मार्च, २०११ अन्वये राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयोमानांत ६० वरुन ६५ वर्षे मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु वयोच्या ६२ वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापूर्वी प्राचार्यांच्या कामकाजाचा विहित समितीकडून आढावा (Performanc Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार संबंधित प्राचार्यांना कमाल ६५ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासन मान्यतेने करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

२. सदर शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.१२ येथे प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयात मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मुदतवाढ देण्याच्या दिनांका पूर्वी किमान ०१ महिना अगोदर संबंधित संचालनालयामार्फत शासन सादर करण्याची संबंधित अकृषि विद्यापीठे व संबंधित संस्थाची राहील, अशी तरतूद आहे.

३. दिनांक ५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयात दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करुन सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. ४ मध्ये प्राचार्यांचे नियत सेवानिवृत्ती वयोमानात वाढ करण्याबाबतचे प्रस्ताव शासन स्तरावर सेवानिवृत्ती पूर्वी २ महिने आगोदर सादर करण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

४. सदर शासन निर्णयातील तरतूदी स्वयंस्पष्ट आहे. मात्र प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयोमानात मुदतवाढ देण्याचे प्रस्ताव दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ४ प्रमाणे २ महिने अगोदर शासनास सादर होत नाहीत. तसेच काही वेळा प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकानंतर त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयात मुदतवाढ देण्याबाबतचे प्रस्ताव शासन सादर होत असल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब पूर्णत: शासन निर्णयातील तरतूदीशी विसंगत

आहेत. त्यामुळे यापुढे प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयात मुदतवाढ देण्याबाबतचे प्रस्ताव दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सादर होतील. याची दक्षता घ्यावी. व त्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

(विजय साबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-संग्रहार्थ

D:\NARESH\Year 2018\Letter 2018.docx